# जिल्हाधिकारी कार्यालय बीड

फोन क्र. : ०२४४२-२२२६०४
E-mail : dpobeed@yahoo.com

फॅक्स क्र. : ०२४४२-२२२०११
(नगरपरिषद प्रशासन)

जा.क्र.2016/जिबी/डेस्क-1/एमयुएन/कावि-

दिनांक 04/07/2016

प्रति,
मुख्याधिकारी,
नगर परिषद बीड, अंबाजोगाई, परळी-वै, माजलगांव, गेवराई व धारुर.

विषय :- नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-2016 प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- मा. अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक-रानिआ/नप-2016/प्र.क्र.10/का-06 दिनांक 15 जून, 2016

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी बीड जिल्हयातील बीड, अंबाजोगाई, परळी-वै, माजलगांव, गेवराई व धारुर या नगरपरिषदांच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारुप प्रभाग रचना संदर्भातील महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 10 अन्वये प्रसिध्द करावयाच्या आदेश व अनुसूचीच्या प्रती या सोबत देण्यात येत आहेत.

सदर आदेश व अनुसूची तसेच प्रारुप प्रभाग रचना नकाशा परिशिष्ट 1 ते 8 सह आपल्या नगरपरिषद कार्यालयात व नगरपरिषदेच्या संकेतस्थळावर व इतर आवश्यक ठिकाणी दिनांक 05/07/2016 रोजी प्रसिध्द करुन अनुपालन अहवाल त्याच दिवशी सादर करावा. आक्षेप व हरकती दाखल करण्याचे ठिकाण हे नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय बीड ठेवण्यात आले असल्याने आपल्या कार्यालयात या संदर्भातील आक्षेप व अर्ज स्विकारु नयेत.

स्वाक्षरित
जिल्हाधिकारी बीड.

प्रत,

1. मा.अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
3. नियंत्रक अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी नगरपरिषद बीड, अंबाजोगाई, परळी-वै, माजलगांव, गेवराई व धारुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
4. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी (NIC) बीड यांना सर्व सहाही नगर परिषदांचे आदेश व अनुसूची देऊन कळविण्यात येते की, सदर आदेश व अनुसूची जिल्हाधिकारी कार्यालयाचे संकेतस्थळावर दिनांक 05/07/2016 रोजी प्रसिध्द करावी.
5. महसुल सहायक, आवक जावक विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना देऊन कळविण्यात येते की, आक्षेप व हरकती दाखल करण्याचे ठिकाण हे नगर परिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय बीड ठेवण्यात आले असल्याने आपल्या कार्यालयात या संदर्भातील आक्षेप व अर्ज स्विकारु नयेत.

जिल्हाधिकारी बीड.

**परिशिष्ट - 6 ब**

**जिल्हाधिकारी बीड यांचेकडुन**

**क्र.2016/जीबी/डेस्क-1/एमयुएन/बीड/001 दि-05/07/2016**

मा. आयुक्त, राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र यांचे आदेश क्र. रानिआ/नपा-2016/प्र.क्र.10/ का-6 दि.07.05.2016 अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 (1965 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 40) (या पुढे सदर अधिनियम म्हणून संबोधित केलेला) चे कलम 10 (1) खाली बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी निम्नोक्त आदेशाच्या अनुसूचित दर्शविल्या प्रमाणे **बीड** नगर परिषद क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित करण्याचे आणि ज्या प्रभागामध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग आणि त्याच प्रमाणे महिलांसाठी (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसह) जागा राखून ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दिष्ट करण्याचे ठरवित आहेत.

2) सदर अधिनियमांच्या कलम 10 पोटकलम (1) च्या परंतुकाप्रमाणे आवश्यक असल्यामुळे उक्त आदेशाचा मसुदा याद्वारे **बीड** जिल्हयातील **बीड** नगर परिषद क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असुन याद्वारे सुचना देण्यात येते की, उक्त आदेशाचा मसुदा तारीख- 05.07.2016 नंतर जिल्हाधिकारी बीड विचारात घेतील.

3) उक्त आदेशाच्या मसुद्यास ज्या लोकांच्या काही हरकती /सुचना असतील त्यांनी त्या हरकती /सुचना सकारण आवश्यक पुराव्यासह नगर परिषद प्रशासन शाखा,पहिला मजला,जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्हाधिकारी बीड यांचे नावे दि.-14.07.2016 पर्यंत किंवा तत्पुर्वी कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत लेखी सादर कराव्यात. उक्त तारखे नंतर आलेल्या हरकती /सुचना जिल्हाधिकारी विचारात घेणार नाहीत.

**आदेशाचा मसुदा**

ज्या अर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नागरी अधिनियम 1965 (सन 1965 चा महाराष्ट्र 40) च्या कलम 9 पोटकलम 2 अन्वये मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशीक संचालक औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे कडील जा.क्र.2016/नपाप्र/आस्था-2/कावि दि.14.05.2016 च्या राजपत्र प्रसिध्दीकरणातील अधिसुचने अन्वये त्यांनी **बीड** जिल्हयातील **बीड** नगर परिषद बाबतीत खाली दर्शविल्या प्रमाणे निवडावयाच्या सभासदांची संख्या, अनुसुचीत जाती, अनुसुची जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा व महिलांसाठी (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केलेल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | निवडाबयाच्या सभासदांची संख्या | 50 |
| 2. | अनुसुचित जाती, अनुसचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यासाठी राखून ठेवावयांच्या जागांची संख्या | |
| | अ) अनुसुचित जाती | 06 |
| | ब) अनुसचित जमाती | 00 |
| | क) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | 14 |

3. महि[illegible] (अनुसुचित जाती, अनुसचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवावयाचा जागा धरुन) 25

4. उपरोक्त क्र. 3 पैकी वरील क्र. (अ), (ब) व (क) येथील जागा मध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| अ) अनुसुचित जाती | 03 |
| ब) अनुसुचित जमाती | 00 |
| क) नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग | 07 |

5. महिलांसाठी सर्वसाधारण जागा म्हणून राखून ठेवावयाच्या जागांची संख्या 15
(अनुक्रमांक 3 समोरील नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक 4 अ, ब, व क समोरील नमुद केलेल्या जागा)

6. सर्वसाधारण (अनारक्षीत) जागांची संख्या 15
(अनुक्रमांक 1 समोर नमुद केलेल्या जागा वजा अनुक्रमांक 2 अ,2 ब,2 क व अनुक्रमांक 5 समोरील नमुद केलेल्या जागा)

2. त्या अर्थी, आता मा. अवर सचिव राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र, यांचे पत्र क्र. रानिआ/ नपा-2016/प्र.क्र .10/का-6 दि. 15 जुन 2016 नुसार व महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी अधिनियम 1965 चे कलम 10, पोटकलम (1) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, बीड याद्वारे **बीड** नगर परिषद क्षेत्र जितक्या भागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती व जनगणना 2011 नुसार प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या आणी त्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या या आदेशाच्या अनुसुचि मध्ये दर्शविल्या प्रमाणे निश्‍चित करीत असुन ज्या प्रभागामध्ये यथास्थिती (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांच्यासाठी व महिलांसह) जागा राखुन ठेवण्यात येतील हे प्रभाग निर्दिष्ट करीत आहे.

7. या आदेशाच्या तारखेच्या निकट नंतरच्या पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ हा आदेश अमलात येईल.

दि. 05 / 07 /2016

**(नवल किशोर राम)**
**जिल्हाधिकारी, बीड.**